Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक २३] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर ८-१४, २०२०/आश्विन १६-२२, शके १९४२ [पृष्ठे १, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०५.

### मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

**वर्धा नगर परिषद हद्दीतील अनधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रण ठेवणेसाठी पदनिर्देशित अधिकारी**

**कार्यालयीन आदेश**

क्रमांक नपव-मु.अ.-आस्था-१९८३-२०२०.––

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक १३ मार्च २०१२ मध्ये प्रसिध्द केल्यानुसार सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ०२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये दुरूस्ती करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम १५२ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम ५५ आणि ५६ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी व अनधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रण आणणेसाठी मुख्याधिकारी यांनी नगर परिषदेच्या बाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२(३) नुसार संबंधित अधिका-यास त्याच कार्यक्षेत्राकरीता पदनिर्देशित अधिकारी म्हणून अधिसूचित करणेची तरतूद करण्यात आली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२(३) मधील तरतुदीनुसार नगर परिषद मुख्याधिकारी म्हणून मला प्राप्त झालेल्या अधिकारात मी, वर्धा नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रासाठी वर्धा नगर परिषदेत कार्यरत असलेले सहा. नगर रचना अधिकारी, श्रीमती आदिश्री धोंडरीकर, यांना अनधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रण आणणेसाठी व अधिनियमातील कलम ५५ व ५६ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी पदनिर्देशित अधिकारी म्हणून घोषित करीत आहे.

**विपीन पालीवाल,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वर्धा.

वर्धा :
दिनांक २१ सप्टेंबर २०२०.

ना.-एक-अ-१ (१६२३).



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.